# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

**डॉ. सुरेंद्र रा. काळबांडे**
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail –registrar@pdkv.ac.in


**महत्वाचे**

**सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता विद्यापीठ सेवेतील गट ''ड'' मधील कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्त्या अद्ययावत ठेवणेबाबत..**

वाचा : (१) शासन निर्णय क्र. सीएफआर-१२९३/९५३/प्र.क्र. ९६/९३/१३, दि. २६ जुलै, १९९४
(२) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएए/०९९४/८०, दि. २६ सप्टेंबर, १९९४
(३) शासन परिपत्रक क्र. सीएफआर-१२०१/ ७२५/१३, दि. २७ फेब्रुवारी, २००३

## परिपत्रक

क्रमांक : बीएए/गट 'ड'/वै.नस्ती/२०२१-२२/७६ दिनांक : १५ /०३/२०२२

चतुर्थ श्रेणी (''ड'' गटातील) कर्मचा-यांचे सन १९९४-१९९५ या वर्षापासून गोपनीय अहवाल लिहीण्याची पध्दत संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये बंद करण्यात आली आहे. त्याऐवजी ''ड'' गटातील प्रत्येक कर्मचा-यांसाठी ठेवण्यात येणा-या वैयक्तिक नस्तीमध्ये संबंधित कर्मचा-यांच्या उत्कृष्ट/ वाईट अशा दोन्ही प्रकारच्या कामासंबंधी वर्षनिहाय नोंदी घेण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

शासन निर्णयातील सदर तरतुदींच्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग/ कार्यालयांतर्गत कार्यरत असलेले प्रयोगशाळा परिचर आणि कृषि मुल्य योजने अंतर्गत कार्यरत असलेले प्रक्षेत्र सहायक वगळता विद्यापीठातील 'ड' गटातील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल न लिहीता त्यांची चांगली/ वाईट वर्तणुक व त्यांनी उल्लेखनीय काम केले असेल तर त्याबाबतचे अभिप्राय दरवर्षी विहित नमुन्यात लिहून ते त्या कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्तीत ठेवण्यात येतात.

**याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, सन २०२१-२०२२ या वर्षामध्ये 'ड' गटातील कर्मचा-यांच्या सेवा ज्या अधिका-यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत त्यांनी कर्मचा-यांची चांगली/ वाईट वर्तणुक व त्यांनी उल्लेखनीय काम केले असेल तर त्याबाबतचे अभिप्राय लिहून ते त्या कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्तीत ठेवण्यासाठी संबंधित आस्थापना अधिकारी यांचे कडे पाठवावेत/ द्यावेत.**

तसेच ज्या कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्तीत त्यांना प्रतिकूल ठरतील असे अभिप्राय नोंदविलेले असल्यास संबंधीत कर्मचा-यांच्या निदर्शनास ते आणून देण्यात यावेत व त्याची प्रत त्यांच्या वैयक्तिक नस्तीत ठेवण्यात यावी.

तथापि, असेही निदर्शनास आले आहे की, यासंदर्भात यापूर्वी विद्यापीठ परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही तथा कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्त्या अद्यावयात ठेवण्याकडे दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे या सेवकांच्या पदोन्नत्या, स्थायीकरण, सेवेत ५५ वर्षानंतर पुढे चालु ठेवण्यासाठी करावयाचे पुनर्विलोकन इत्यादी यावर परिणाम होतो.

याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व कार्यालय/ विभाग प्रमुख यांना पुन:श्च अवगत करण्यात येते की, उपरोक्त नमुद शासन निर्णय व परिपत्रकातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल व त्यानुसार **चतुर्थ श्रेणी (गट ''ड'') कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्त्या दरवर्षी स्वतंत्ररित्या अद्ययावत ठेवल्या जातील याची सर्व संबंधितांनी दक्षता घेण्यात यावी. तसेच यापूर्वीच्या वर्षाच्या वैयक्तिक नस्त्या प्रलंबित असेल तर त्या प्राधान्याने अद्ययावत करणेबाबत आपल्या कार्यालयीन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.**

सदर परिपत्रक व प्रमाणपत्राचा नमूना विद्यापीठाचे संकेतस्थळ ***(www.pdkv.ac.in)*** वर उपलब्ध करण्यात आले आहे.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला



D:\2022\CR 2021-22\Class IV\Circular 2020-21 Class IV Employees.doc

**प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :**

१. संचालक (शिक्षण)/ संचालक (संशोधन)/ संचालक (कृषि विस्तार शिक्षण), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
२. अधिष्ठाता (कृषि)/ अधिष्ठाता (कृषि अभियांत्रिकी)/ अधिष्ठाता (शिक्षण)/ अधिष्ठाता (उद्यानविद्या), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
३. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला/ नागपूर/ गडचिरोली/ मुल,चंद्रपूर/ उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला/ वनविद्या महाविद्यालय, अकोला/ कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, अकोला/ पदव्युत्तर शिक्षण संस्था, अकोला/ निम्न कृषि शिक्षण, अकोला/ व.ना.कृ.जै.तं.म.,यवतमाळ/ अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ.
४. विभाग प्रमुख, कृषिविद्या/ कृषि वनस्पतीशास्त्र/ कृषि वनस्पती रोगशास्त्र/ मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र/ किटकशास्त्र/ उद्यानविद्या/ वनविद्या/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र/ कृषि विस्तार शिक्षण/ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
५. विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी/ मृद व जलसंधारण/ कृषि शक्ती व औजारे/ कृषि प्रक्रिया/ कृषि स्थापत्य/ सिंचन व निचरा/ अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत आणि विद्युत अभियांत्रिकी विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
६. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कापूस/ ज्वारी/ तेलबिया/ कडधान्य/ गहू संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला
७. सहयोगी संशोधन संचालक, संशोधन संचालनालय, अकोला/ विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवमाळ/ सिंदेवाही
८. प्रमुख शास्त्रज्ञ, अ.भा.स.सं.प्र.,(कोडरवाहू शेती)/ संशोधन अभियंता,अ.भा.स.सं.प्र.,(कापणी पश्चात तंत्रज्ञान)/ वरिष्ठ उद्यानविद्यावेत्ता, अ.भा.स.सं.प्र.,( लिंबूवर्गीय फळे ), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
९. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र / कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०. विद्यापीठ ग्रंथपाल/ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
११. उपसंचालक संशोधन (बियाणे)/ बियाणे संशोधन अधिकारी, बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभाग, अकोला
१२. मुख्य बिजोत्पादण अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणीरंभापूर
१३. मुख्य कृषि विद्यावेत्ता, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्प/ क्षेत्र अधिकारी, कृषि मुल्य योजना, अकोला
१४. पैदासकार तथा उद्यानविद्यावेत्ता, मिरची व भाजीपाला संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
१५. माहिती अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१६. प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती/ उद्यानविद्यावेत्ता, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल
१७. प्राध्यापक तथा प्रमुख, कृषिविद्या शाखा/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र शाखा/ उद्यानविद्या शाखा, कृषि महा., नागपूर
१८. प्रभारी अधिकारी, नागार्जून वनऔषधी केंद्र/ मत्सशास्त्र संशोधन केंद्र/ विद्यापीठ मुद्रणालय/ डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र/ माळी प्रशिक्षण/ डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१९. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केद्र, अचलपूर/ यवतमाळ/ वाशिम/ बुलढाणा/ एकार्जूना/ कुटकी/ सिंदेवाही/ सोनापूर/ थारसा/ साकोली/ नवेगांवबांध/ पानवेली संशोधन केंद्र, दिवठाणा/ रामटेक/ कडधान्य व गळीत धान्य संशोधन केंद्र, आमगांव म्हाली/ जवस पैदासकार तथा प्रभारी अधिकारी, जवस संशोधन केंद्र, नागपूर/ महाराजबाग प्राणी संग्रहालय, नागपूर/ वनशेती संशोधन फुटाळा फार्म, नागपूर
२०. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, निंबी-मालोकार/ बुलढाणा/ धारणी/ वरुड/ सावंगी/ सेलसुरा/ हिवरा/ मुल-मारोडा
२१. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा/ यवतमाळ/ सेलसुरा/ साकोली/ सोनापूर/ सिंदेवाही/ हिवरा
२२. उपकुलसचिव (आस्थापना)/ उपकुलसचिव (साप्रवि)/ उपकुलसचिव (विद्याविषयक)/ सहा. कुलसचिव (समिती)
२३. अधिदान व लेखाधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला/ कृषि महाविद्यालय,नागपूर
२४. ........................................................................................ , डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
२५. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
२६. कुलगुरु यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला



D:\2022\CR 2021-22\Class IV Circular 2020-21 Class IV Employees.doc

# <u>प्रमाणपत्राचा नमुना</u>

श्री. ........................................................................... हे या कार्यालयाच्या अधिनस्त मजुर/ परिचर/ चौकीदार/ माळी/ सफाई कामगार/ ग्रंथालय परिचर/ मत्स्य सहायक/ सफाई पर्यवेक्षक/ खानसामा/ प्रक्षेत्र सहायक/ व्हॉलमन या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या सन २०२१-२०२२ या वर्षातील (दि. ............................ ते दि.............................) या कालावधीमध्ये त्यांनी केलेल्या कामाची नोंद घेण्यात आली असून त्यांचे कामाचे मुल्यांकन खालील प्रमाणे आहे.

(अ) अत्युत्कृष्ट (ब) उत्कृष्ट (क) वाईट

शेरा : ........................................

ठिकाण :
दिनांक :

प्रतिवेदन अधिकारी यांची सही/ नाव/ पदनाम

पुनर्विलोकन अधिकारी यांची सही/ नाव/ पदनाम

टिप :

(१) कृषि मुल्य योजने अंतर्गत कार्यरत असलेले प्रक्षेत्र सहायक वगळता इतर सर्व विभाग/ कार्यालयातील प्रक्षेत्र सहायकांकरीता सदर प्रमाणपत्र लागू राहील.

(२) उपरोक्त नमूद कर्मचा-यांचे प्रमाणपत्र कुलसचिव कार्यालयास न पाठविता आपले कार्यालयीन स्तरावर संबंधीत कर्मचा-यांच्या वैयक्तीक नस्तीला जोडण्यात यावे.

"ड" गटातील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत बंद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.सीएफआर-1293/953/प्र.क्र.96/93/13,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 26 जुलै 1994.

## शासन निर्णय

चतुर्थ श्रेणीतील (आताचे "ड" गटातील) शासकीय कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची प्रथा शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-1276/दहा-जे, दिनांक 13 जुले, 1976 अन्वये 1975-76 सालापासून सुरु करण्यात आली. गोपनीय अहवाल लिहिण्याची सदर प्रथा बंद करण्यात यावी अशी मागणी चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली होती. ती मागणी शासनाच्या विचाराधीन होती. आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, "ड" गटातील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत 1994-95 या वर्षापासून बंद करण्यात यावी.

2. शासकीय सेवेतील वरील कर्मचा-यांची गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत बंद केल्यानंतर या सेवकांच्या पदोन्नत्या, स्थायीकरण, दक्षता रोध, आगाऊ वेतनवाढी, सेवेत 55 वर्षानंतर पुढे चालू ठेवण्यासाठी पुनर्विलोकन इ. सेवाविषयक बाबी हाताळणे शक्य व्हावे यादृष्टीने अशा कर्मचा-यांच्या चांगल्या कामाची अथवा त्यांच्याकडून घडलेल्या प्रमादाची/वाईट वर्तणूकीची नोंद ठेवणे आवश्यक असल्याने असाही निर्णय घेण्यात आला आहे की, विभागातील "ड" गटातील प्रत्येक कर्मचा-यासाठी जी वैयक्तिक नस्ती (Personal File) ठेवण्यात येते, त्यांत कर्मचा-यांच्या उत्कृष्ट/वाईट अशा दोन्ही प्रकारच्या कामासंबंधी वर्षनिहाय नोंद घेण्यात यावी. जेथे अशा प्रकारची नोंद/नोंदी उपलब्ध नसतील तेथे त्या कर्मचा-यांचे वर्तन सर्वसाधारण चांगल्या स्वरुपाचे आहे असे समजण्यात यावे व त्यांना अनुज्ञेय असलेले सेवाविषयक लाभ, उदा. पदोन्नती, दक्षतारोध पार करण्यास अनुमती इ. देण्यास प्रत्यवाय नसावा. तथापि, आगाऊ वेतनवाढी, प्राधम्य तत्वावर पदोन्नती किंवा सवतीने सेवानिवृत्ती या बाबीसंबंधी उत्कृष्ट/वाईट अशा विशिष्ट नोंदी-अभावी कार्यवाही करण्यात येऊ नये.

3. वरील प्रकारे वैयक्तिक नस्ती ठेवताना खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

(1) "ड" गटातील कर्मचा-यांच्या सेवा ज्या अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येतील त्यांनी त्या कर्मचा-यांची चांगली/वाईट वर्तणूक व त्याने उल्लेखनीय काम केले असेल तर, त्याबाबतचे अभिप्राय लिहून ते त्या कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्तीत ठेवण्यासाठी संबंधीत आस्थापना अधिका-याकडे पाठवावेत.

(2) ज्या कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्तीत त्यांना प्रतिकूल ठरतील असे अभिप्राय नोंदविलेले असल्यास संबंधीत कर्मचा-याच्या निदर्शनास ते आणून देण्यात यावेत व त्याची प्रत त्यांच्या वैयक्तिक नस्तीत ठेवण्यात यावी.

(3) "ड" गटातील. कर्मचा-यांची एका विभाग/कार्यालयातून दुस-या विभाग/कार्यालयात बदली झाल्यास त्याची

c/3

वैयक्तिक नस्ती त्या विभाग/कार्यालयाकडे पाठविण्यात यावी. वैयक्तिक नस्तीतील अभिलेख विचारात घेऊन नंतरच आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र. मा. जोशी)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, मुंबई,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
येरवडा तुरुंग मुद्रणालय, पुणे/शासकीय मुद्रणालय, नागपूर,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग.

* पत्राने.

------

एन-820(5,000-7-94)

C/3

C/5 9

पंजाबराव कृषि विद्यापीठ,अकोला-४४४ १०४

परिपत्रक

क्र.बीएए/०९९४/ 10 दिनांक: २६.९.१९९४.

विद्यापीठातील सर्व प्रतिवेदन अधिकारी (रिपोर्टींग ऑफीसर) व पुनर्विलोकन अधिकारी (रिव्यूईंग ऑफीसर) ह्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने चतुर्थश्रेणी ("ड"-गट) कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत शासन निर्णय क्र.सीएफआर-१२९३/९५३/प्र.क्र.९६/९३/१३, दि.२६ जुलै,१९९४ नुसार १९९४-९५ या वर्षा-पासून बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासन निर्णयाची प्रत ह्या परिपत्रकासोबत मार्गदर्शनासाठी पाठविण्यात येत आहे. ह्या निर्णयानुसार ह्यापुढे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात येवू नयेत, मात्र त्यांची वैयक्तिक नस्ती (पर्सनल फाईल) ठेवण्यात यावी व त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट/वाईट अशा दोन्ही प्रकारच्या कामासंबंधी वर्ष-निहाय नोंद घेण्यात यावी व ती नस्ती संबंधित कार्यालय प्रमुख/ईचार्ज ह्यांचे जवळ ठेवावी. ह्याबाबत वैयक्तिक नस्ती ठेवताना कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी ह्याची माहिती सोबतच्या शासन निर्णयात दिली आहे, त्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

कुलगुरुंच्या मंजुरी व आदेशानुसार.

स्वाक्षरीत/- कुलसचिव,
पंजाबराव कृषि विद्यापीठ,अकोला

क्र.बीबीएए/०९९४/ LC
पं.कृ.वि.,अकोला, दि.२६.९.१९९४.

प्रति,

____________________

____________________

____________________

ह्यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

उपकुलसचिव,(आस्था.)
पंजाबराव कृषि विद्यापीठ,अकोला.

C:\Users\AUNIT_2\Desktop\Circular 2017-2018 Class IV Employees.doc

C/5

267 C/7

गट 'ड' मधील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक नस्त्या अद्ययावत ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: सीएफआर-१२०१/७२५/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २७ फेब्रुवारी, २००३

**वाचा:-** १) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. सीएफआर-१२९३/९५३/प्र.क्र.९६/९३/१३, दिनांक २६ जुलै, १९९४.

**परिपत्रक**

चतुर्थ श्रेणीतील ('ड' गटातील) शासकीय कर्मचाऱ्यांचे सन १९९४-९५ या वर्षापासून गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत शासन निर्णय क्र. सीएफआर-१२९३/९५३/ प्र.क्र.९६/९३/१३, दिनांक २६ जुलै, १९९४ अन्वये बंद करण्यात आली आहे. त्याऐवजी विभागातील 'ड' गटातील प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या वैयक्तिक नस्तीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याच्या उत्कृष्ट/वाईट अशा दोन्ही प्रकारच्या नोंदी घेण्यात याव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, दिनांक २६ जुलै, १९९४ च्या आदेशान्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही यास्तव सदर आदेशाचा पुनरुच्चार करुन असे निर्देशित करण्यात येते की, सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल व त्या अनुषंगाने गट 'ड' मधील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक नस्त्या अद्ययावत ठेवल्या जातील याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

कुलसचिव
APR 2003

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( बा. बा. नारायणकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

537

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचेसचिव
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रवंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रवंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, मुंबई,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
येरवडा तुरुंग मुद्रणालय, पुणे शासकीय मुद्रणालय, नागपूर,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* पत्राने

राच - ९९२ए (८०००-३-०३)